दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

**प्रतिनिधी नेमणे आहे**
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.१५ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 15 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 229 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# विजयी मेळावा मराठी पुरताच होता; त्याचा राजकारणाशी संबंध नाही:राज ठाकरेंचे विधान

**नाशिक (वृत्तसंस्था)–राज्यात महापालिका निवडणुकांची तयारी सुरू असताना ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. मुंबईत मराठीच्या मुद्द्यावर झालेल्या विजयी मेळाव्यानंतर उद्धव आणि राज ठाकरे तब्बल वीस वर्षांनी एका व्यासपीठावर एकत्र आले. त्यानंतर या दोघांची पालिका निवडणुकीत एकत्र येण्याची शक्यता अधिकच वाढली होती. मात्र, विजयी मेळावा मराठी पुरताच होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही, असे विधान राज ठाकरे यांनी केले आहे. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा पुन्हा अनिश्चिततेच्या वाटेवर गेली आहे.सध्या नाशिकमध्ये मनसेचे तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आजपासून या शिबिराला सुरुवात झाली असून मनसे प्रमुख राज ठाकरे हे शिबिरासाठी इगतपुरी येथे दाखल झाले आहेत. यावेळी त्यांनी अनौपचारिक गप्पांदरम्यान विजयी मेळाव्याबाबत भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या युतीचा सस्पेन्स आणखी वाढला आहे.**

मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठीच्या मुद्यावर होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही, असे राज ठाकरे यांनी म्हटले. तसेच नोव्हेंबर – डिसेंबर दरम्यान चित्र स्पष्ट होईल. त्यांनतर युती संदर्भातील निर्णय बघू, असेही त्यांनी स्पष्ट केले.हिंदी सक्तीच्या जीआरबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले की, हिंदी सक्तीच्या बाबतील आताच्या सरकारने जीआर काढला होता. मागील सरकारने त्याचा अहवाल स्वीकारला होता, पण त्याचा जीआर काढला नव्हता, अंमलबजावणी केली नव्हती.मनसेने नेते आणि पदाधिकाऱ्यांसाठी विशेष शिबिराचे आयोजन केले असून, या शिबिराला आजपासून इगतपुरी येथे सुरुवात झाली आहे. हे शिबीर तीन दिवस चालणार असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे स्वतः तीनही दिवस इगतपुरीत मुक्कामी राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या शिबिराला महत्त्व प्राप्त झाले आहे.दरम्यान, आत्तापर्यंत आमची निवडणूक आम्ही एकट्याने लढवली आहे, त्यामुळे आताही वेळ आली तर एकटे निवडणूक लढवू, अशी सूचक प्रतिक्रिया मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली होती. यावर उद्धव ठाकरेंनीही भाष्य केले. यासंदर्भात बोलू नये, असे आदेश त्यांच्या पक्षप्रमुखाने दिले आहेत, असे म्हणत आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू द्या, मग बोलू, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरेंनी दिली होती.दरम्यान, आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठीच असे वक्तव्य खुद्द उद्धव ठाकरे यांनी केले. जे महाराष्ट्राच्या मनात आहे ते होईल असेही ते म्हणाले होते. युतीबाबत शिवसेना ठाकरे गटाने टाळी दिलेली असताना दुसरीकडे मात्र मनसे सावध पवित्रा घेत असल्याचे दिसून येत आहे. राज ठाकरेंच्या विधानानंतर ठाकरे बंधूंच्या युतीचा सस्पेन्स आता आणखी वाढला आहे.



# सुजलेगाव येथे १०० वारकऱ्यांचा पवन गादेवार यांनी केला सन्मान

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगाव तालुक्यातील सुजलेगाव येथील हनुमान मंदिर येथे आर्य वैश्य महासभा महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख तथा युवा उद्योजक पवन गादेवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिनांक ९ जुलै २०२५ रोजी आषाढी आळंदी ते पंढरपूर पायी वारी करणाऱ्या भजनी मंडळ पहारेकरी व वारकऱ्यांचा शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला यात १०० हून अधिक वारकरी सहभागी होते पवन गादेवार हे समाजातील लोकप्रिय व्यक्ती म्हणून मानले जातात उद्योगा सोबतच सामाजिक क्षेत्रात सदैव अग्रेसर राहून समाजातील तळागाळातील गोरगरीब जनतेची ते सेवा करतात त्यांच्या पाठीशी तरुणांची मोठी फळी



असून त्यांनी समाजातील ब–याच हिताचे विविध उपक्रम वर्षभर राबवतात त्यांच्या वाढदिवसानिमित्त पहाटेपासूनच सोशल मीडियाच्या माध्यमातून व फोन द्वारे मित्र मंडळ व हितचिंतकांनी शुभेच्छा दिल्या त्यांच्या वाढदिवसाची सुरुवात सकाळी नरसीतील भगवान बालाजी मंदिरात पूजा आरती व प्रसाद घेऊन झाली खंडोबा मंदिर नरसी, महादेव मंदिर गंगनबीड खंडोबा मंदिर घुंगराळा, साईप्रबतेश्वर मंदिर माळ ईकळी. साईबाबा मंदिर नायगाव. आधी देवदर्शनाने झाली त्यांच्या उत्तम समाजकार्याची जाणीव ठेवून महासभेचे अध्यक्ष नंदकुमार जी गादेवार यांनी फोन द्वारे शुभेच्छा दिल्या,कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज येथे पतसंस्था संचालक व कर्मचारी यांचा दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग संपन्न,४३ पतसंस्था सहभागी

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,बीड यांच्या संयुक्त विद्यमाने केज तालुक्यातील नागरी,ग्रामीण,कर्मचारी पगारदार पतसंस्थेचे संचालक व कर्मचारी यांच्या करिता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.या दोन दिवसीय प्रशिक्षणवर्गात सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे प्राचार्य बी.जे. ठोंबरे व उपप्राचार्य एस. आर.कोल्हे,श्रीमती एम.एस.वहावळे सहकार संलग्न अधिकारी,मुख्य लिपिक,सहाय्यक निबंधक केज,सी.ए. खोडसे प्रमाणित लेखा परीक्षक सहकारीसंस्था बीड यांनी सहकार कायदा,नियामकमंडळ,ठेव सुरक्षितता व कर्ज वितरण बाबतचे निकष, सभा वृत्तांत,नवीन नियमावली,उपविधी दुरुस्ती,नवीन नियम तसेच २०२४–२०२५ या आर्थिक वर्षाचे सहकार



पुरस्कार निकष,सर्व पतसंस्थांनी सामाजिक कार्यात पुढाकार घ्यावा इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.समारोप प्रसंगी जिल्हा सहकारी संघ बोर्डाचे नवनिर्वाचित संचालक बबनराव आंधळे,श्रीमती एम.एस वहावळे मुख्य लिपिक सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज, खोडसे सी.ए प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड यांच्या हस्ते दोन दिवस सहभाग नोंदवलेल्या कर्मचारी संचालक यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सहकार प्रशिक्षण विभाग,लातूर उपप्राचार्य एस.आर. कोल्हे यांनी केले.

# मध्यम तुरळक तर २० जुलै पासून समाधानकारक पाऊस पडेल हवामान अभ्यासक तज्ज्ञ पंजाबराव डंख

**नांदेड । हनुमंत चंदनकर**

महाराष्ट्र नांदेड जिल्ह्यात येत्या दोन दिवसांत मध्यम ते तुरळक तर २० जुलै पासून समाधानकारक पाऊस पडेल असा अंदाज हवामान अभ्यासक तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी दिला गेला काही दिवसांपासून पाऊसाने दडी मारल्याने शेतीतील पिकें सुकू लागली आहेत सोयाबीन कापूस तूर मूग उडीद आदी शेतीपिकावर रोगाचा प्रादुर्भाव होत आहे यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे शेतीतील



ओलावा जेमतेम शिल्लक आहे शेतकऱ्यांनी दिवसेंदिवस पावसाची वाट पाहत आहे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता धीर धरावा वीस पासून २० जुलैपासून शेती पिकांना पूरक असा पाऊस पडेल असा अंदाज पत्रकारांशी संवाद साधताना हवामान अभ्यासक पंजाबराव डक यांनी दिला शेतकऱ्यांनी आपले शेती कामे उरकून घ्यावी पिकातील अंतर मशागत निंदन फवारणी कोळपणी केरकर रावेचने आदी कामे उरकून घ्यावे वीस पासून पावसाला सुरुवात होणार आहे असा अंदाज यावेळी शेतकऱ्यांना दिला.

# बावी गावचा गौरव... शेतकऱ्यांकडून नायब तहसीलदार भागीरथ धारक यांचा मन:पूर्वक सत्कार!

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

बावी गावचा अभिमान वाढवणारा क्षण! गावचे शेतकरी बबन सोनवणे, सचिन गोल्हार आणि बाबासाहेब पवार कोहिनी यांनी नुकतेच नायब तहसीलदार पदी निवड झालेल्या भागीरथ धारक यांचा पारंपरिक पद्धतीने पंचा,टोपी,नारळ,पुष्पगुच्छ आणि गुलाल उधळून मन:पूर्वक सत्कार केला.

या प्रसंगी तहसील कार्यालयातील कर्मचारी शरद मेरगळ,तुकाराम भवर आणि अशोक धोंडे यांची उपस्थिती होती. गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमानाचे भाव झळकत होते. भागीरथ धारक यांच्यासारखे अधिकारी हे खऱ्या अर्थाने लोकसेवक आहेत.त्यांना पुढील वाटचालीस यश आणि कीर्ती मिळो,अशा शुभेच्छा गावकऱ्यांनी दिल्या. गावकऱ्यांच्या प्रेमातून अधिकारी भागीरथ धारक यांना दिला लोकमान्यतेचा सन्मान!



# साठे जयंतीच्या अध्यक्षपदी पुरुषोत्तम वीर तर सचिवपदी मिलिंद सरपते यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली असून, शासकीय विश्रामगृह बीड बैठकी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा वीर विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार पुरुषोत्तम वीर यांची अध्यक्षपदी आणि मिलिंद सरपते यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. सहसचिवपदी संदीप जाधव, कोषाध्यक्षपदी रोहन मगर आणि सदस्य म्हणून आकाश साबळे, युनुस भाई, राजकुमार जोगदंड यांची निवड झाली आहे. पाशा भाई यांना उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि शहराध्यक्ष लखन जोगदंड व तालुकाध्यक्ष किरण वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कामकाज करत आहे.या समितीद्वारे वंचित, बहुजन आणि शोषित समाजासाठी योगदान देणाऱ्या अण्णाभाऊ साठेंच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्याचा प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जातील.पुरुषोत्तम वीर यांनी यावेळी सांगितले की, अण्णाभाऊ



साठे हे वंचित समाजासाठी आदर्श व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या कार्याची जयंती उत्सव समितीद्वारे समाजापर्यंत पोहोचविणे हा आमचा उद्देश आहे.मिलिंद सरपते यांनीही सांगितले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या अभंगांनी आणि साहित्याने समाजाला एकत्र करण्याचे काम केले आहे. त्यांच्या जयंती उत्सवातून त्यांच्या विचारांचा आणि संदेशाचा प्रसार व्हावा, यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.या उत्सवाद्वारे समाजातील शोषित घटकांना सशक्त करण्यासाठी आणि सामाजिक समरसतेसाठी काम करण्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे. लवकरच या जयंती उत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित होणार आहेत. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे आजी–माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# लाडक्या बहिणींमुळे इतर योजनांना निधी मिळण्यास विलंब दत्तात्रय भरणेंच्या विधानाने राजकीय वर्तुळात पुन्हा चर्चा





**पुणे (वृत्तसंस्था)**–राज्याचे कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे यांनी नुकतेच इंदापूरमधील घरकुलाच्या धनादेश वाटप कार्यक्रमात उपस्थिती लावली. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी इंदापूर तालुक्यातील विकासकामांबाबत सविस्तर माहिती दिली. विशेषतः, निधी वितरणात होणाऱ्या विलंबावर भाष्य करताना त्यांनी लाडकी बहीण योजना याला अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरवलं.मंत्री दत्तात्रय भरणे पुढे बोलताना म्हणाले की, मी सातत्याने पाठपुरावा करत असतो, मग मी कुठेही असलो तरी इंदापूरसाठी अधिकाधिक निधी मिळवण्याचा प्रयत्न करतो. मात्र सध्या लाडकी बहीण योजनेमुळे निधी वितरणात उशीर झालेला आहे. आता मात्र परिस्थिती सुधारत आहे. दत्तात्रय भरणे म्हणाले की, इतर जिल्ह्यांमध्ये निधी कमी मिळतो, मग इंदापूरलाच कसा मिळतो, असा सवाल विचारला जातो. म्हणूनच मी बातम्या देत नाही, व्हिडीओ वा शो करत नाही. विरोधक व्हॉट्सपवर काय टाकतात याचा फरक पडत नाही. इंदापूरची जनता अतिशय समजूतदार आहे.यापूर्वीही भरणे यांनी लाडकी बहीण योजनेमुळे इतर विकासकामांमध्ये अडथळा येत असल्याचे सूचित केले होते. आता पुन्हा त्यांनी त्या योजनेचा उल्लेख केल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या या योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर मोठा ताण आल्याचे बोलले जात होते. त्यामुळे इतर विकास कामांमध्ये निधी वाटप विलंबित झाल्याच्या चर्चांना आता अधिकृत छाप मिळाल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. भरणे यांच्या विधानामुळे या मुद्द्यावर विरोधकांना हत्यार मिळाले आहे.सामाजिक न्याय विभागातील अनुसूचित जाती घटकांसाठी ४१०.३० कोटींचा निधी वळवण्यात आला असल्याची माहिती समोर आली होती. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली होती. याआधी लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला असल्याचे देखील बोलले जात होते.

## जमीयतुल कुरैश समाजाची बैठक घेऊन मोठा निर्णय



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नगर शहरातील जमीयतुल कुरैश समाजाची बेपारी मोहल्ला झेंडीगेट येथे जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली या बैठकीत एकमुखाने सर्व समाज बांधवांच्या वतीने जनावरांची खरेदी विक्री चा व्यापार बंद करण्यात आले असल्याचा हा एक मोठा निर्णय घेण्यात आला या निर्णयाला सर्व समाज बांधवांनी स्वागत करत येणाऱ्या काळात जमीयतुल कुरैश समाजातील व्यक्ती जनावरांचा व्यापार करणार नसल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. अधिकृत परवानगी असणाऱ्या जनावर खरेदी विक्री करण्यासाठी नेत असताना देखील काही संघटनेच्या वतीने जमीयतुल कुरैश समाजाला जाणून-बुजून टार्गेट केले जात आहे व पोलीस प्रशासनाला चुकीची माहिती देऊन कोणताही पुरावा नसतांना खोटे गुन्हे दाखल करण्याचे काम करत असून कायद्याने मान्यता प्राप्त जनावर आणली तरी त्रास होत आहे व संपूर्ण जिल्ह्यात चालू असलेल्या गोहतेच्या नावा खाली चालु असलेली दहशत तथाकथित गोरक्षक यांच्याकडून जमीयतुल कुरैश समाजातील व्यक्तींनी व्यापारासाठी आणलेले जनावरे हे कतली साठी घेऊन जात असल्याचा खोटा आरोप करत पोलिसांच्या ताब्यात देऊन मारहाण करून पैसे काढून गुन्हे दाखल होऊन वाहने व आदी साहित्य जप्त होत असल्याने यामध्ये कुरेशी समाजाचा मोठा नुकसान होत आहे. त्यामूळे कुरेशी समाज हा जनावरांची खरेदी विक्रीचा व्यवसाय बेमुदत बंद केला.जनावरे खरेदी-विक्री करत असून शेतकरी व खाटीक यांची एक नाळ आहे जे शेतकऱ्यांचे भाकड जनावरे असतात जे दूध देत नाही काम करत नाही हे फक्त खाटीक शिवाय विकत कोणीच घेत नाही व कायद्याने मान्यता प्राप्त त्या जनावरांना हे पैसे देऊन जनावरे खरेदी करतात मात्र काही संघटनेचे लोक खाटीकांना मारहाण करून त्यांच्या पासून पैसे घेतात व रीतसर कागदपत्र असताना देखील अडवत आहे. त्यामुळे संपूर्ण खरेदी-विक्रीचा व्यवहार बंद करून लवकरच संपूर्ण जिल्ह्यात समाजाच्या वतीने शासनाला निवेदन देण्यात येणार असल्याचे देखील सांगण्यात आले बैठकीत संपूर्ण जिल्ह्यातील जमीयतुल कुरैश जमातचे पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## हिवरेबाजारमध्ये वृक्षारोपण व सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त हिवरेबाजार (ता. पारनेर) येथे आयोजित वृक्षारोपण सोहळा व सत्कार समारंभ विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.या वेळी प्रा.राम शिंदे यांनी हिवरेबाजार ग्रामस्थांच्या वतीने विधानपरिषदेच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल आयोजित सत्कार स्वीकारला. तसेच, त्यांनी हिवरेबाजार गावात दुर्मिळ देशी वृक्षांच्या लागवडीच्या उपक्रमात सहभाग नोंदवत वृक्षारोपण केले.कार्यक्रमास पद्मश्री पोपटराव पवार, आमदार काशिनाथ दाते, सरपंच विमलताई ढाणगे, ज्येष्ठ नेते वसंतराव चेडे, सुभाष दुधाडे, अमोल मैड, ग्रामस्थ, विद्यार्थी व आदर्शगाव योजनेअंतर्गत प्रशिक्षणासाठी राज्यातील ४० गावांमधून आलेले ७० प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पद्मश्री पोपटराव पवार यांच्या संकल्पनेतून हिवरेबाजार ग्रामस्थांनी गेल्या २६ वर्षांत विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते १८७६ दुर्मिळ देशी वृक्षांची लागवड सुरू केली असून हा उपक्रम निसर्गसंवर्धनासाठी महत्त्वाचा ठरत आहे. हिवरेबाजारने जलसंधारण, सामाजिक समता व ग्रामविकासाच्या कार्यातून संपूर्ण देशाला आदर्श घालून दिला असून पद्मश्री पोपटराव पवार यांच्या दूरदृष्टीने व नेतृत्वाने गावाचा कायापालट केला, असे गौरवोद्गार प्रा.राम शिंदे यांनी यावेळी काढले.या प्रेरणादायी भूमीत सत्कार स्वीकारणे माझ्यासाठी अत्यंत आनंददायी व अभिमानास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले व ग्रामस्थांचे आभार मानले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त हिवरेबाजार (ता. पारनेर) येथे आयोजित वृक्षारोपण सोहळा व सत्कार समारंभ विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.या वेळी प्रा.राम शिंदे यांनी हिवरेबाजार ग्रामस्थांच्या वतीने विधानपरिषदेच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल आयोजित सत्कार स्वीकारला. तसेच, त्यांनी हिवरेबाजार गावात दुर्मिळ देशी वृक्षांच्या लागवडीच्या उपक्रमात सहभाग नोंदवत वृक्षारोपण केले. कार्यक्रमास पद्मश्री पोपटराव पवार, आमदार काशिनाथ दाते, सरपंच विमलताई ढाणगे, ज्येष्ठ नेते वसंतराव चेडे, सुभाष दुधाडे, अमोल मैड, ग्रामस्थ, विद्यार्थी व आदर्शगाव योजनेअंतर्गत प्रशिक्षणासाठी राज्यातील ४० गावांमधून आलेले ७० प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पद्मश्री पोपटराव पवार यांच्या संकल्पनेतून हिवरेबाजार ग्रामस्थांनी गेल्या २६ वर्षांत विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते १८७६ दुर्मिळ देशी वृक्षांची लागवड सुरू केली असून हा उपक्रम निसर्गसंवर्धनासाठी महत्त्वाचा ठरत आहे.हिवरेबाजारने जलसंधारण, सामाजिक समता व ग्रामविकासाच्या कार्यातून संपूर्ण देशाला आदर्श घालून दिला असून पद्मश्री पोपटराव पवार यांच्या दूरदृष्टीने व नेतृत्वाने गावाचा कायापालट केला, असे गौरवोद्गार प्रा.राम शिंदे यांनी यावेळी काढले.या प्रेरणादायी भूमीत सत्कार स्वीकारणे माझ्यासाठी अत्यंत आनंददायी व अभिमानास्पद असल्याचेही त्यांनी सांगितले व ग्रामस्थांचे आभार मानले.

## कोसळणाऱ्या धबधब्यावर काचेचा पूल

## महाराष्ट्रात या ठिकाणी जाताच पर्यटक होणार थक्क!

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या निसर्गरम्य सिंधुदुर्ग जिल्ह्याचे प्रवेशद्वार असलेल्या वैभववाडी तालुक्यातील प्रसिद्ध नापणे धबधबा आता पर्यटकांना एका अनोख्या अनुभवाची पर्वणी देणार आहे. या बारमाही वाहणाऱ्या धबधब्यावर राज्यातील पहिला काचेचा पूल उभारण्यात आला आहे. हा पूल पर्यटकांचे नवे आकर्षण केंद्र बनला आहे. नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या या धबधब्याच्या विलोभनीय दृश्यात हा पूल भर घालत आहे. यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला देशातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आले आहे. पश्चिम महाराष्ट्रातून जिल्ह्यात प्रवेश करताना वैभववाडी तालुका हे जिल्ह्याचे प्रवेशद्वार आहे. या जिल्ह्यात येणारा कोणताही पर्यटक नापणे धबधब्याला भेट दिल्याशिवाय पुढे जात नाही, असे म्हटले जाते. दरवर्षी देश-विदेशातून हजारो पर्यटक या निसर्गरम्य ठिकाणी येतात. नापणे धबधब्याचे सौंदर्य खरोखरच मनमोहक आहे. धबधब्याच्या दोन्ही बाजूंनी असलेली हिरवीगार झाडी, उंचावरून खोल डोहात कोसळणारे धबधब्याचे




फेसाळणारे पांढरेशुभ्र पाणी आणि विविध पक्षांचा किलबिलाट असे विलोभनीय नैसर्गिक दृश्य पर्यटकांना मंत्रमुग्ध करते. उन्हाळ्यात पर्यटक कुटुंबासोबत नदीत उतरून धबधब्याचा आनंद घेतात. मात्र, पावसाळ्यात नदीतील पाण्याचा प्रवाह मोठा असल्याने धबधबा रौद्र रूप धारण करतो, ज्यामुळे पर्यटकांना लांबूनच त्याचे दर्शन घ्यावे लागते. पण आता या काचेच्या पुलामुळे पर्यटकांना जवळून धबधब्याचा अनुभव घेता येत आहे. या पुलाला कमानी पद्धतीचे रंगीत कुंपण लावण्यात आले आहे. या पुलावरून मुख्य धबधब्याचे विलोभनीय दृश्य पाहता येणार आहे. मुख्य धबधब्याच्या वरच्या बाजूला असलेले लहान धबधबे देखील पाहता येत आहेत. यामुळे पावसाळ्यातही पर्यटकांना आता धबधब्याचा जवळून अनुभव घेता येत आहे. महाराष्ट्रातील अशा प्रकारचा हा पहिलाच काचेचा पूल ठरला आहे. नापणे धबधबा कोल्हापूर-तरळे राष्ट्रीय महामार्गावरील नाधवडे गावापासून सुमारे सहा किलोमीटर अंतरावर आहे. तसेच, वैभववाडी रेल्वे स्टेशनपासून हा धबधबा केवळ तीन किलोमीटर अंतरावर आहे, ज्यामुळे येथे पोहोचणे खूपच सोपे आहे.

## हिंदी पेपर कसा चालवता? गुणरत्न सदावर्ते यांचा उद्धव ठाकरेंना थेट सवाल

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही काळापासून मराठी विरुद्ध हिंदी वाद सुरु आहे. मनसे आणि ठाकरे गटाने याबाबत आंदोलन देखील केलं आहे. विधीतज्ज्ञ गुणरत्न सदावर्तेंनी मनसे आणि ठाकरे गटाच्या भूमिकेवर टीका केली होती. त्यानंतर आता राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाच्या हिंदी सेलचे राज्य प्रमुख आणि महासचिव पारसनाथ तिवारी यांनी गुणरत्न सदावर्ते यांची भेट घेतली. हिंदी भाषा वाचवण्यासाठी, संविधानच्या रक्षणासाठी , कायद्याच्या संरक्षणासाठी पारसनाथ यांनी सदावर्तेंची भेट घेतली. यानंतर बोलताना सदावर्ते काय म्हणाले ते जाणून घेऊयात. असंही सदावर्ते यांनी सांगितले. या भेटीनंतर बोलताना पारसनाथ तिवारी म्हणाले की, 'महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. यात गुणरत्न सदावर्ते भारतीय संविधानाचं रक्षण करत आहेत. हिंदी विरोधात राजकारण करणाऱ्यांविरोधात मी जी भूमिका घेतली तशीच भुमिका गुणरत्न सदावर्ते घेत आहेत. गुणरत्न सदावर्ते हे आधूनिक अब्राहम लिंकन आहेत. जीवाची पर्वा न करता ते लढत आहेत. राज्यात मराठी सक्तीची आहेच पण हिंदीचाही अपमान होता कामा नये.'या भेटीनंतर बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, 'देशातील चळवळी विचारांवर उभ्या राहतात.



देशाची भाषा हिंदी आहे, पण भाषेच्या नावावर कापाकापी करू नये. पारसनाथ तिवारी आणि इतर विद्वानांनी माझा सन्मान केला आहे. यापुढे या राज्यात तिसरी भाषा शिकवली जाणार. हिंदी भाषा देशाची प्रिय भाषा आहे, कोकणात हिंदी भाषिक काम करतात. त्यामुळे हिंदी गरजेची आहे.'उद्धव ठाकरेंवर टीका करताना सदावर्ते म्हणाले की, 'उद्धव ठाकरेंनी विनय शुक्ला हे हिंदी भाषेतील शिक्षक कुणाला हिंदी शिकवतात ते सांगावं. ते दोपहर का सामना चालवतात. लोकांना सांगतात हिंदी शिकू नका मग हिंदी भाषेचा पेपर का चालवता? हिंदी भाषेच्या नावावर कमाई करता. तुमचा पेपर वाचण्यासाठी हिंदी तर यायला हवी ना. त्यासाठी शोळेपासून हिंदी शिकणे गरजेचे नाही का? उद्धव ठाकरेंचा विचार दिशाभूल करणारा आहे. हिंदीचा इतका तिरस्कार असेल तर दोपहरचा सामना का चालवता?' असा सवाल सदावर्तेंनी विचारला आहे.तिसरी भाषा कंपल्सरी केलीच पाहीजे. शासन निर्णय पुनश्च लागू करावा. ठाकरे बंधूंच्या विरोधात पुढच्या आठवड्यात कोर्टात याचिका दाखल करणार आहे. राज्यात हिंदी शिकली जाईल आणि शिकवली जाईल

## दलित पँथर सारखी पुन्हा तरुणांची फौज उभी करण्याचा माझा प्रयत्न-केंद्रीय राज्यमंत्री आठवले

**मुंबई । प्रतिनिधी**

अनेकदा मी नेत्यांना लिहिले पत्र कधीतरी या एकत्र पण नेते एकत्र येत नाहीत.राजकीयदृष्ट्या गटबाजी असली तरी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावासाठी आजही आंबेडकरी जनतेत अभेद्य एकजूट आहे.रिपब्लिकन ऐक्यासाठी आम्ही भारतीय दलित पँथर बरखास्त केली.रिपब्लिकन ऐक्यात आलो नसतो तर भारतीय दलित पँथर मोठी राजकीय ताकद असती.आंबेडकरी चळवळीला पुढे घेऊन जाण्यासाठी सामाजिक पातळीवर तरुणांची एकजूट केली पाहिजे.पुन्हा एकदा अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारी दलित पँथर सारखी तरुणांची फौज उभी करण्याचा माझा प्रयत्न आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.माता रमाबाई आंबेडकर नगर येथे गोळीबारकांडातील शहिदांच्या २८ व्या स्मृतीदिनी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आयोजित जाहीर श्रद्धांजली सभेत ना.रामदास आठवले बोलत होते.

माता रमाबाई आंबेडकर नगर येथे ११ जुलै १९९७ रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्यानंतर त्या निषेधार्थ झालेल्या आंदोलनात भीमसैनिकांवर बेछूट पोलिसी गोळीबार करण्यात आला.त्यात माता रमाबाई आंबेडकर नगरातील १० शहीद झाले.त्यांच्या स्मृतीदिनी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने माता रमाबाई आंबेडकर नगर येथे जाहीर श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती.मागील २८ वर्षांपासून रिपाइं तर्फे ही श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात येत असून प्रत्येक वर्षी ना.रामदास आठवले या सभेत उपस्थित राहून शहीदांना श्रद्धांजली अर्पण करतात.माता रमाबाई आंबेडकर नगरातील डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आज पूर्णाकृती पुतळा उभा आहे.यापूर्वी तिथे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धाकृती पुतळा होता. त्या पुतळ्याच्या उद्घाटनास ना.रामदास आठवले हे त्यांच्या लग्नाच्या रात्री उपस्थित राहूनपुतळ्याचे उद्घाटन केले होते.त्यावेळी त्यांच्या सोबत नवपरिणीत नववधू सीमाताई आठवले ही उपस्थित होत्या.याची आठवण ना. रामदास आठवले यांनी सांगितली.माता रमाबाई आंबेडकर नगरशी येथील गल्ली गल्ली शी माझा सबंध आला आहे.अनेक वर्षे मी दलित पँथर च्या चळवळीत रमाबाई कॉलनीत मी येत राहिली अशी आठवण ना.रामदास आठवले यांनी सांगितली.यावेळी सर्व शहीदांना रिपब्लिकन पक्षातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी लोकप्रिय गायक आनंद शिंदे; वारकरी संप्रदायाचे नेते विठ्ठल पाटील; सभाध्यक्ष राजा गांगुर्डे; रिपाइं चे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड; काकासाहेब खंबाळकर; डी एम चव्हाण; श्रीकांत भालेराव; नंदकुमार साठे; शिलाताई गांगुर्डे; अनिल गांगुर्डे; विनोद जाधव; अजित रणदिवे; मुश्ताक बाबा; सोहेल शेख; प्रकाश जाधव; प्रकाश मोरे;अशोक हिरे; काका गांगुर्डे; श्रीधर साळवे; चंद्रशेखर कांबळे;शशिकला मनोहर जाधव; भारती गुरव; उदयराज तोरणे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.



# बेशिस्त वागणारा माझा नातलग किंवा कितीही मोठ्या बापाचा असला तरी त्याला टायरमध्ये घाला

## राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांची पोलिसांना सूचना

**पुणे (वृत्तसंस्था)**–सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बेशिस्त वर्तन करणाऱ्यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे. बेशिस्त वागणारा माणूस कितीही मोठ्या बापाचा असला तरी मी पोलिसांना त्याला टायरमध्ये घेऊन झोडायला सांगणार आहे. नियम सर्वांसाठी समान आहेत. मग तो अजित पवार असो किवा अजित पवारांचा कुणी नातलग असो, असे ते म्हणालेत.अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी बारामती येथील सावित्री हॉस्पिटलचे उद्घाटन झाले. यावेळी बोलताना त्यांनी हुल्लडबाजी करणाऱ्यांना उपरोक्त शब्दांत इशारा दिला. ते म्हणाले, कधी कधी दुचाकीवाले इकडे–तिकडे पाहतात आणि हळूच राँग साईडने ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करतात. असा माणूस सापडला तर तो मुलगा किंवा व्यक्ती कितीही मोठ्या बापाचा असला तरी, मी त्याला टायरमध्ये घेऊन झोडायला सांगणार आहे. त्याला त्याच्या १० पिढ्या आठवल्या पाहिजेत. कुणीही अजिबात नियम तोडू नका. मग तो अजित पवार असो की अजित पवाराचा नातलग असो. सर्वांना नियम सारखा आहे.

अजित पवार पुढे म्हणाले, मी जे करतो ते बारामतीकरांसह सर्वांसाठी करतो. मी अनेक ठिकाणी झाडे लावली. पण तिथे कुणीपण येत आहे. जनावरे चरत आहेत. पण तसे चालणार नाही. जिथे माणसांना बसण्यासाठी जागा केली आहे, तिथे एक दुचाकीस्वार निवांत मांडी घालून लोकांसोबत गप्पा मारत होता. मी गाडी वळवली व पोलिसांना सांगितले की, याची गाडी ताब्यात घे आणि याला चांगला टायरमध्ये घाल. मग त्याने चुकले म्हणून विनवणी केली.



### मोकाट जनावरांच्या मालकांवर कारवाई करणार

**अजित पवारांनी यावेळी शहरातील मोकाट जनावरांच्या मुद्यावरही भाष्य केले. काही जण चुका करतात. रस्त्यावर कचरा टाकतात. जनावरे चरायला सोडतात. मी त्यांना सांगतो, ती जनावरे कोंडवाड्यात घाला. ऐकले तर ठीक, नाही तर मी त्यांना बाजार दाखवतो. मालकांनाही माझा इशारा आहे. त्यांच्यावरही केसेस होतील. ज्यांची गाढवं आहेत, जनावरे आहेत, ज्यांच्या गायी इकडे–तिकडे फिरत असतात, त्यांनी ते आपल्या दारात बांधाव्यात. त्यांना काय खायला–प्यायला घालायचे ते घालावे. मी बारामती जी चांगली करतो, ती काय सर्वांना कसेही फिरण्यासाठी नाही, असे ते म्हणाले.**

# दिव्यांग,जेष्ठांना मिळणार कृत्रिम साहित्य; शिबीराचा लाभ घ्यावा खा.बजरंग सोनवणे यांचे आवाहन



### आवश्यक कागदपत्रे

**दिव्यांग: दिव्यांग प्रमाणपत्र आणि युडीआयडी कार्ड, आधार कार्ड,वार्षीक उत्पन्नाचा दाखला/ रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे मासिक २२५०० किंवा वार्षीक २७०००० च्या आत,व जेष्ठ नागरिकांसाठी आधार कार्ड,वार्षीक उत्पन्नाचा दाखला/रेशन कार्ड उत्पन्न दर्शविणारे मासिक १५००० किवा वार्षीक १८०००० च्या आत असावे.अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, एस.एन.मेश्राम यांनी दिली आहे.**

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये दिव्यांगांना व जेष्ठ नागरीकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटप करण्याच्या अनुषंगाने दि.१८ ते ३० जुलै २०२५ या कालावधीमध्ये पूर्व तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे.या शिबीरात दिव्यांग, जेष्ठांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केले आहे. शिबीरामध्ये दिव्यांगांना जयपुर फुट,कृत्रिमहात, कॅलीपर,व्हिलचेअर, ट्रायसिकल,क्रचेस, वॉकींग स्टीक,ब्रेल किट,स्मार्ट फोन, श्रवणयंत्र या सह जेष्ठ नागरीकांकरीता बेल्ट, वॉकर,काठया,चष्मे, कृत्रिम दात,खुबड, कृत्रिम अवयव,कानाची मशिन, व्हिलचेअर कमोडसहीत,सिलीकॉन खोम तकीया,नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरव्हायकल कॉलर या सह इतर साहित्य वाटपाच्या अनुषंगाने पुर्व तपासणी शिबीर त्या–त्या तालुक्यातील पंचायत समिती मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.बीडजिल्ह्या तील केज येथे सदर शिबीराचे उद्घाटन दि.१८जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता खा.बजरंग सोनवणे, बीड लोकसभा मतदार संघ यांच्या हस्ते प्रमुख मान्यवरांच्या उपस्थिती त होणार आहे.तालुका स्तरावर सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत शिबीर असेल अशी माहिती एस.एन.मेश्राम –जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद,बीड यांनी दिली आहे.दरम्यान,या शिबीरात साहित्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी केले आहे.

### शिबीराबाबत अधिक माहिती
### तालुका दिनांक ठिकाण

**केज १८ जुलै पंचायत समिती,अंबाजोगाई १९ जुलै पंचायत समिती, बीड २१ जुलै पंचायत समिती,माजलगाव २२ जुलै पंचायत समिती, पाटोदा २३जुलै पंचायत समिती,वडवणी २४ जुलै पंचायत समिती, आष्टी २५ जुलै पंचायत समिती,धारूर २६ जुलै पंचायत समिती,परळी २८ जुलै पंचायतसमिती**

**शिरूर २९ जुलै पंचायत समिती,गेवराई ३०जुलै पंचायत समिती या कालावधी मध्ये होणार आहे.**

# संत तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम परंपरेप्रमाणे इंदापूर शहरातच व्हावा–स्थानिकांची भावनिक मागणी

**इंदापूर । प्रतिनिधी**


जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी परंपरेनुसार दरवर्षी इंदापूर शहरात थांबत असते. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून ही परंपरा खंडित झाली असून, यावर्षी पालखीचा केवळ काही वेळ मुक्काम होत असल्याने इंदापूरकर भाविकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे पुढील वर्षी पालखीचा पारंपरिक मुक्काम इंदापूर शहरातच राहावा, अशी सामूहिक मागणी भाविकांतून केली जात आहे.

रविवार, दिनांक १३ जुलै रोजी सकाळी ८ वाजता पालखी परतीच्या प्रवासात इंदापूर शहरातील श्रीराम चौक येथे काही वेळ विश्रांतीसाठी थांबली होती. या वेळी इंदापूरकरांनी वारकऱ्यांसाठी चहा–नाश्त्याची सेवा केली. हजारो भाविकांनी संत तुकाराम महाराजांच्या पवित्र पादुकांचे दर्शन घेतले. पालखीचे विश्वस्त, सोहळा प्रमुख, वारकरी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी अनेक इंदापूरकर भाविकांनी पालखी सोहळ्याचे विश्वस्त आणि आयोजकांशी संवाद साधत, पालखीचा मुक्काम पुन्हा जुन्या परंपरेनुसार शहरात ठेवण्यात यावा अशी विनंती केली. पालखीचा मुक्काम इंदापूरमध्ये नसल्याने भाविकांना दर्शनासाठी खूप अंतर चालावे लागते, त्यात वृद्ध आणि महिला भाविकांना अधिक अडचणींचा सामना करावा लागतो. यामुळे भावनिकदृष्ट्या जोडलेल्या या सोहळ्यातून इंदापूरकर वंचित राहात असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

पालखी हा इंदापूरकरांचा मोठा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक उत्सव आहे. शहरात मुक्काम झाल्यास भाविकांना समाधान मिळेल आणि पारंपरिक वातावरण पुन्हा अनुभवता येईल,अशी भावना अनेक वारकऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी बोलून दाखवली.भाविकांच्या या सामूहिक इच्छेला मान देत पालखीचे विश्वस्त आणि सोहळा प्रमुखांनी या विषयावर गांभीर्याने विचार करण्याचे आश्वासन दिले आहे.

# नेकनूर पोलीस ठाण्या हद्दीतील लिंबागणेश येथील दुकानातून सहा लाखांचा ऐवज चोरी



**बीड (प्रतिनिधी)**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील श्रीराम पाठक यांच्या मालकीच्या शिवम मशीनरी अँड इलेक्ट्रिकल्स या दुकानात बुधवारी रात्री चोरीची घटना घडली. श्रीराम पाठक हे काल गेवराई येथे नातेवाईकांच्या लग्नास गेल्यामुळे दुकान दिवसभर बंद होते. गुरुवारी सकाळी अशोक वायभट यांनी फोन करून दुकानाचे शटर तुटले असल्याची माहिती पाठक यांना दिली. त्यांनी तात्काळ दुकानात धाव घेतली असता, चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश करून वायंडिंग वायर, स्क्रॅप यासह एकूण अंदाजे ५.५ ते ६ लाख रुपयांचा माल लंपास केल्याचे समोर आले. तसेच दुकानातील गल्ला फोडून त्यामधील ५ ते ६ हजार रुपये चोरीला गेल्याची माहिती श्रीराम पाठक यांनी दिली. घटनेची माहिती मिळताच नेकनूर पोलीस ठाण्याचे पोउनि. अप्पासाहेब रोकडे, पो. विशाल क्षीरसागर तसेच लिंबागणेश पोलीस चौकीचे स.फौ. बाबासाहेब राख, गोविंद बडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या चोरीप्रकरणी सपोनि. चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## खोटी तक्रार देणे महागात पडले अन् बनाव अंगाशी आला !

# वाटमारी करून पावणेदोन लाख रु.चोरले असल्याची खोटी तक्रार देणाऱ्या विरुद्ध केज पोलिसांनी केला गुन्हा दाखल

**केज । गौतम बचुटे**

साखर कारखान्याची ऊस तोडणीसाठी उचल घेऊन गावाकडे जात असतना मोटार सायकल वरून आलेल्या तिघांनी पाठलाग करून रस्त्यात अडवून मारहाण करून शस्त्राचा धाक दाखवून त्याच्या जवळील पावणे दोन लाख रु. घेवून पळून गेले. अशी तक्रार देण्यासाठी पोलिस ठाण्यात आलेल्या युवकाच्या बोलण्यात तफावत आढळून आल्याने पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी बनावट तक्रार देणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केज तालुक्यातील तरनळी येथील अंगद अनंत खेडकर हा दिनांक १३ जून रोजी रात्री १०:३० वाजता केज पोलीस ठाण्यात आला. त्याने पोलिसांना सांगितले की तो. दि. १३ जुलै रोजी ऊसतोड मुकदमा कडून १ लाख ७५ रु. ची उचल घेऊन तो मोटार सायकली वरून कानडी माळी मार्गे तरनळी या त्याच्या गावाकडे जात असताना रात्री ८:३० ते ९:०० वाजण्याच्या सुमारास कानडीमाळी गावाजवळ त्याचा मोटार सायकली वरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्याचा पाठलाग करून त्याला गावापासून दीड किमी अंतरावर निर्जनस्थळी अंधारात अडविले. त्याला दगडाने मारहाण केली आणि शस्त्राने जीवे मारण्याची धमकी देत त्याच्या पँटच्या खिशातील १ लाख ७५ हजार रु., मोबाईल आणि मोटार सायकलची चावी घेऊन पळून गेले. अशी माहिती अंगद याने पोलिस ठाण्यात दिली. मात्र चाणाक्ष असलेल्या पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी एवढे पैसे पॅन्टच्या खिशात कसे मावले? तसेच एवढी रक्कम घेऊन तो एकटाच आणि एवढ्या रात्री आडमार्गाने का जात अटसावा ? या बाबत शंका आली. तसेच एवढ्या रकमेच्या नोटा किती होत्या ? हे त्याला सांगता येईनासे झाले. त्याच बरोबर पोलीस निरीक्षक उनवणे यांनी सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस हेडकॉन्स्टेबल बाळासाहेब अहंकारे, पोलिस हेडकॉन्स्टेबल त्रिंबक सोपने यांनी तपास करून सायबर शाखेच्या अधिकाऱ्यांनी अंगद खेडकर यांच्याशी कोणी कोणी संवाद साधला. या बाबत गुप्त माहिती घेतली. त्या नंतर पोलिसांची खात्री पटली की, तक्रारदार याचे पैसे चोरीला गेले नसून हा बनाव आहे. हे निदर्शनास येताच पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या आदेशाने महिला पोलिस जमादार निर्मला जाधव यांच्या तक्रारी वरून खोटी माहिती देऊन पोलिस यंत्रणेला वेठीस धरण्याचा प्रयत्न करणाऱ्या अंगद खेडकर याची विरुद्ध अदखलपात्र गु. र. नं. ७४६/ २०२५ भा. न्या. सं. २१७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकोस्टेबल त्रिंबक सोपने हे तपास करीत आहेत.



# अक्कलकोट येथे प्रविण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करत केजमध्ये भव्य निषेध मोर्चा,तहसीलदारांना निवेदन सादर



शिव सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ओरिजनल

**केज । प्रतिनिधी**

संभाजी ब्रिगेडचे प्रविण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट (सोलापूर) येथे दिनांक १३ जुलै २०२५ रोजी करण्यात आलेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करत केज येथे संभाजी ब्रिगेड वविविध बहुजन संघटनाच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे प्रविण गायकवाड यांच्या फोटोला दुधाने दुग्धाभिषेक करून त्यांच्यावरील हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यात आला.त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसिल कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला.या मोर्चाच्या समारोपास तहसील दारांना निवेदन देऊन संबंधित समाजकंटकां वर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

या वेळी उपस्थितीत संभाजी ब्रिगेडचे राहुल खोडसे,सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले सर,हनुमंत घाडगे सर, शेकापचे भाई मोहन गुंड,वंचित बहुजन आघाडीचे नेते लिंबराज बापू गायकवाड, आरपीआय(आठवले) चे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे,छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी दादा ठोंबरे,संदीप शितोळे,संजय लोंढे, कमलाकर चव्हाण, बालासाहेब डोंगरे, प्रतिक भोसले, जोतिराम माने,कैलास चाळक,शशिकांत इंगळे,विनोद शिंदे, दिगंबर नाना तपसे, गोविंद गोरे,लक्ष्मण ओव्हाळ,गौतम बचुटे, विनोद गायकवाड, सुरज काळे,राहुल काळे,अशोक गायकवाड,अविनाश इंगळे तसेच केज तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येनेउपस्थित होते. या निवेदनाद्वारे संभाजी ब्रिगेड वविविध संघटनांनी व बहुजन समाजाने सरकारकडे मागणी केली की, हल्लेखोरांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.तसेच गृहविभागाकडे हे निवेदन पोहोंचवावे, अशी नम्र विनंती तहसीलदार यांच्या कडे करण्यात आली.निषेध मोर्चात सहभागी झालेल्या सर्व कार्यकर्त्यांनी प्रवीण गायकवाड यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# डॉ.साक्षी म्हणजे ज्ञानाचा दीपस्तंभ

**बीड (प्रतिनिधी)**

शिक्षक हा ज्ञानाचा दीपस्तंभ असतो, तो विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रकाश आणतो. या वाक्याचा अर्थ डॉ. साक्षी आशिष भोईटे यांच्या कार्यातून स्पष्टपणे जाणवतो. त्या केवळ विज्ञान शिक्षिका नाहीत, तर एक प्रेरणादायी वक्त्या, समुपदेशक, ग्राफोथेरपिस्ट म्हणून विद्यार्थ्यांच्या जीवनात उजळ परिवर्तन घडवतात.आजच्या काळात ताणतणाव हे सामान्य झाले आहे. सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यास ताण माणसाला स्वतःची ओळख पटवून देतो, पण नकारात्मकतेच्या गर्तेत गेल्यास तो आयुष्यातील आनंद हिरावून घेतो. डॉ. साक्षी अशा मानसिक संघर्षांवर काम करतात. योग, ध्यान, ग्राफोथेरपी व समुपदेशनासारख्या विविध माध्यमांतून त्या डिप्रेशन व आत्महत्येच्या विचारांशी लढणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरल्या आहेत.

त्यांच्या या कार्यामुळे अनेक कुटुंबांमध्ये पुन्हा आनंद फुलू लागला आहे. शिक्षण, मानसिक आरोग्य आणि शारीरिक प्रगती या सर्वांवर लक्ष देणाऱ्या त्यांच्या विज्ञान शिक्षकांच्या टीमने विद्यार्थ्यांसाठी दिलेले योगदान अविस्मरणीय आहे.

या सन्माननीय कार्यासाठी २०२५ मध्ये डॉ. साक्षी आशिष भोईटे आणि त्यांच्या टीमला आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या टीममध्ये विजय वाघेला (मुख्य मॉडरेटर – विज्ञान १), स्मिता पडगावकर आणि सतीश मिश्रा यांचा विशेष सहभाग आहे. हे शिक्षक केवळ विषय शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या मनोविश्वालाही आकार देतात आणि याच प्रेरणादायी कार्याची अधिकृत दखल घेण्यात आली. २९ जून २०२५ रोजी साईदरबार, शिर्डी येथे आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ समारंभात महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील ३६ शिक्षकांना पारदर्शक पद्धतीने निवडून सन्मानित करण्यात आले. यावेळी राज्य आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री डॉ. पोपटरावजी पवार यांनी पुरस्कार प्रदान केले.

या गौरवयात्रेत मुंबई व पालघर जिल्ह्यातील अनेक शिक्षकांचा समावेश होता. मधुकर सर, ज्योती किरण सनाये, नॅन्सी स्वामी, वैभव कोठारी, विलमा मॅडम, वंदना मॅडम, सोनाली भालेकर, निशा मांजरेकर, किशोर पांचाळ, जुईली पाटील, परवीन सय्यद, ऍलेक्स फिलिप, रेखा प्रभू, खान अब्दुल रहमान इरफान, समृद्धी मोरे, अंजना मिश्रा, सुजाता सूर्यवंशी, रुचिका कपाडिया, दर्शना पारेख, काजल सुर्वे... हे सर्व शिक्षक आपल्या ज्ञानाच्या प्रकाशाने समाज उजळवत आहेत.

शिक्षण म्हणजे केवळ गुणपत्रक नव्हे, तर विचारांचा, समजुतीचा, आणि जीवनदृष्टीचा प्रकाश. अशा दीपस्तंभांनी समाज उजळतो, विद्यार्थ्यांच्या मनात आणि भविष्यातही.

# आ.धनंजय मुंडे यांच्या आवाहनाला इंजेगाव ग्राम पंचायतचा सकारात्मक प्रतिसाद

# विहिर कार्यारंभ आदेश वाटप,आरोग्य तपासणी व औषधोपचार,विद्यार्थ्यांना डिफीन डब्बा गणवेश वाटप,वृक्षारोपण,शिवलीलाअमृत ग्रंथ वाटप अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन

## राष्ट्रवादीचे नेते अजय मुंडे व माणिक फड यांच्या उपस्थितीत होणार कार्यक्रम

## सामाजिक उपक्रम राबवून आ.धनंजय मुंडे यांना देणार वाढदिवसाच्या शुभेच्छा-सौ.विद्या अमोल कराड

**परळी । वैजनाथ**

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत इंजेगाव ग्राम पंचायतच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जलसिंचन विहिरीच्या कार्यारंभ आदेशाचे वाटप, मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार, विद्यार्थ्यांना टिफिन डबा, गणवेश वाटप, वृक्षारोपण, शिवलीलाअमृत ग्रंथ वाटप अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक नेते अजय मुंडे व माणिक फड यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सर्व कार्यक्रमांचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन इंजेगावच्या सरपंच सौ. विद्या अमोल कराड यांनी केले आहे.

आ. धनंजय मुंडे यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. वाढदिवसाचे बॅनर न लावता सामाजिक उपक्रम घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत इंजेगावच्या सरपंच सौ. विद्या अमोल कराड यांनी विविध सामाजिक कार्यक्रमाद्वारे आ. धनंजय मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याचा निर्णय घेतला आहे. यानिमित्त त्यांनी गावातील शेतकरी, नागरिक, विद्यार्थी, युवक आणि महिलांसाठी विविध सामाजिक उपक्रम आयोजित केले आहेत. गावातील शेतकऱ्यांसाठी मंजूर झालेल्या जलसिंचन विहिरीच्या कार्यारंभ आदेशाचे वाटप, आरोग्य तपासणी शिबिर व मोफत औषधोपचार, पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना टिफिन डब्बा वाटप, विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, गावात विविध ठिकाणी वृक्षारोपण, महिलांना शिवलीलाअमृत ग्रंथ वाटप आदी सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.आ. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा म्हणजे दिनांक १५ जुलै रोजी हे विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. कार्यक्रमांचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक नेते अजय मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मार्केट कमिटीचे संचालक माणिक फड यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. यावेळी प्रसिद्ध हृदयरोग, मधुमेह व अतिदक्षता तज्ञ डॉ. सचिन गीते, नेत्ररोग तज्ञ डॉ. रोहन जोगदंड, दंतरोग तज्ञ डॉ. श्रीकांत कराड यांची विशेष उपस्थिती राहणार आहे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान माजी शिक्षणाधिकारी हिरालाल कराड भूषविणार आहेत.शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा विषय असलेल्या जलसिंचन विहिरीच्या कार्यारंभ आदेशाचे वाटप तर श्रावण महिन्याचे महत्व लक्षात घेऊन महिलांसाठी शिवलीलामृत ग्रंथाचे वाटप आणि विद्यार्थ्यांसाठी गणवेश व डब्बा अशा विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून याचा सर्व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा असे आवाहन इंजेगावच्या सरपंच सौ. विद्या अमोल कराड यांनी केले आहे.




## दलीत,भुमीहीन यांना जमिनीचा मालक बणविणया साठी लढा तीव्र करणार-मानवी हक्क अभियान

**माजलगाव । प्रतिनिधी**

गायरान जमिनी नावच्या करा, या जमिनीवर होणारे शासकीय प्रकल्प रोखा यासाठी मानवी हक्क अभियान ने प्रा.डॉ. मिलींद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय कार्यालयावर दि. १४ जुलै २०२५ रोजी मोर्चा काढण्यात आला

दलीत, भूमिहीन, कष्टकरी समाज आपली कौटुंबिक उपजिका भागवून सन्मानाने जगण्यासाठी गेली अनेक वर्ष पडीक असलेल्या गाव

यरान जमिनी वहिनी करत आहे. अनेकवेळा शासकीय जी.आर.निघून सुद्धा त्याची अंमलबजावणी होत नसल्याने या गायरानधारकांना जमिनीवर मालकि हक्क मिळत नसल्याने मानवी हक्क अभियान च्या वतिने संघठनचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलींद आवाड यांच्या नेतृत्वाखाली आजतागायत विहिरीत असलेली सर्व गायरान जमिनी कास्तकरांच्या नावे कराव्यात, या जमीनीवर शासनाकडून उभे केले जात असलेले सर्व प्रकल्प रोखावे, ऊसतोड कामगारना माथाडी कामगार कायद्यांच्या अंतर्गत असलेल्या सर्व तरतूदी लागू करुन या मजुरांना विम्याचे संरक्षण लागु करावे, वयोवृदधांना संजय गांधी निराधार व इंदिरा गांधी निराधार योजनेत प्रतिमहा ६००० रु मासिक अर्थ सहाय्य लागु करा, बेघर कूटुबांसाठी घरकुल योजनेसाठी ५ लाख रु अशी आर्थिक तरतूद करावी, मागास वर्गीय विद्यार्थ्यांना



शिष्यवृत्ती वाढिव , वेळेवर मिळावी, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ , मौलाना आझाद विकास महामंडळ यांना भरीव, ठोस निधी देण्यात यावा, आर्टी, बार्टी या संस्था ना ठोस, भरीव निधी उपलब्ध करावा, गांव तिथे दलितांना पक्की स्मशान भुमी असावी

या प्रमुख मागण्यांसाठी जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चास महाराष्ट्र चे कार्याध्यक्ष मच्छिंद्र गवारे, धोंडीराम पाटोळे, राधिका चिंचोली कर, मधुकर कांबळे, विष्णु मुजमुले, महादेव उमाप, बाबासाहेब थोरात, बंडु लोखंडे, धोंडीराम हातागळे , रघूनाथ कसबे, अमरजित मुजमले यांनी मार्गदर्शन केले.

या मोर्चात प्रामुख्याने रमेश गवळी ,बाबासाहेब मुजमुले, अनिकेत वाघमारे, प्रल्हाद दळवी, राहुल आवाड, मारोती भीसे, बंडु खंडागळे, बबन खंडागळे, किसन लोखंडे, हणुमान लोखंडे, बळीराम कारके, कचरु कांबळे, लग्न रडके, अनिल राधे कांबळे, महादेव खंडागळे यांच्यासह हजारो जनसमुदाय उपस्थित होता .मोर्चाचे सूत्रसंचालन बाबासाहेब थोरात यांनी केले तर आभार शहराध्यक्ष संदीप वाघमारे यांनी केले.

## विद्यार्थ्यांनो गरज म्हणून अभ्यास करा-राजेश गिड्डे

**केज । प्रतिनिधी**

दि.१४/०७/२०२५ रोजी साने गुरुजी निवासी विद्यालयात तहसीलदार राजेश गिड्डे साहेब यांच्या हस्ते निवासी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले याप्रसंगी साहेबांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले विद्यार्थ्यांनो शिक्षण घेत असताना गरज म्हणून शिक्षण घ्या त्याला ऐच्छिक समजू नका शिक्षण हे ऐच्छिक नसते ती गरज वाटली पाहिजे गरज वाटते तेव्हाच माणूस यशाची शिखरे पादाक्रांत करत असतो. शिक्षण घेत असताना तीन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत त्या म्हणजे मार्गदर्शन, खरं बोलणे, परिश्रम घेणे या होत. योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास यश निश्चित असते फक्त त्यासाठी कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे व त्याचबरोबर खरं सुद्धा बोलणं तेवढंच महत्त्वाचं आहे. शिक्षणाबरोबर खेळाची सुद्धा तितकीच गरज आहे खेळ सुद्धा खेळले पाहिजेत मी शालेय जीवनात सतत क्रिकेट खेळत होतो . एक वेळेस शाळा बुडवून क्रिकेट खेळल्याने वडिलांनी शाळा बंद केली आणि मग मी मात्र आईला कन्व्हिन्स करून पुन्हा शाळेत गेलो व पुन्हा कधीच अशी वेळ येऊ दिली नाही की त्यांनी मला शाळेत जा म्हणावं हा अनुभव देखील विद्यार्थ्यांसोबत आदरणीय साहेबांनी शेअर केला.आणि आणखीनही खेळतो पण गरज म्हणून



अभ्यासाकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. तसेच शाळेत येताना नीटनेटकेपणाने व व्यवस्थित तयारीने यावे जर आपण कोणत्याच बाबतीत सक्रिय नसू तेव्हा कोणीही शिक्षक आपल्याला वाहवा देत नाही चांगले हुशार असेल तर शिक्षक सुद्धा आपल्याला प्रेरित करतात.हे त्यांनी स्वतःचेच उदाहरण देताना सांगितले . मी केज ला आलो तेव्हा मला असे वाटले की आता मी या नवीन ठिकाणी आलो पण ज्या वेळेस केज मधीलच काही विद्यार्थी माझे स्पर्धा परीक्षेतील सोबती आहेत हे लक्षात आल्यावर इथे सुद्धा मोठ्या प्रमाणात टॅलेंट आहे याची जाणीव मला झाली आणि केज मध्ये आल्याचा आनंद देखील झाला. त्याचबरोबर अध्यक्षीय भाषणात बोलत असताना बद्दल प्रशासकीय अधिकारी कसा असावा याचे एक उदाहरण देऊन साहेबांचा आदर करत अशाच प्रशासकीय अधिकाऱ्याची सध्याला गरज आहे असे गौरव उद्गार काढले. तर विद्यार्थ्यांना आपली परिस्थिती बदलायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही शिक्षणात सर्व काही बदलू शकतो असे सांगितले.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या प्राचार्य डॉक्टर कविता कराड यांनी केले तर सूत्रसंचालन श्री चोले सर यांनी केले. प्रतिनिधी स्वरूपामध्ये काही विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करून साहेबांनी पुन्हा विद्यार्थ्यांसोबत सह भोजनास येण्याची अपेक्षा व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते.

## वसंतनगर ग्रा.पं.च्या महिला सरपंचसह कुटुंबा वर प्राणघातक हल्ला;५ ते ७ जण गंभीर जखमी


### अंबाजोगाई दवाखान्यात उपचार सूरू;सरपंचदाचा राजीनामा का देत नाही म्हणून हल्ला

### हल्लाखोरावर गुन्हा दाखल करावा-राठोड कुटुंबीयांची मागणी

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील लमानतांडा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वसंतनगर ग्रामपंचायत महिला सरपंचसह कटूंबावर गावातील १५ ते २० लोकांनी प्राण घातक हल्ला केला आहे. सरपंचदाचा राजीनामा का देत नाही म्हणून हल्ला करण्यात आला आहे. ५ ते ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांचावर अंबाजोगाई येथील स्वराती सरकारी दवाखान्यात उपचार सूरू आहेत. हल्लाखोरावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी राठोड कुटुंब यांनी केली आहे.





याबाबत अधिक माहिती अशी की, वसंतनगर तांडा येथे रात्री नऊ वाजता माजी सरपंच श्री दत्तात्रय सखाराम राठोड याच्या सांग्यावरून विद्यपानचे महिला सरपंच सौ.शाहूबाई विजय राठोड सरपंच पदाचा राजीनामा का देत नाही म्हणून पूर्ण कुटूंबावर प्राण घातक हला करण्यात आला गावातील १)रवी रामराव चव्हाण २)विकास रामराव चव्हाण ३)अजित बबन चव्हाण ४)नितीन गजानन उर्फ गजानद चव्हाण ५)अभिजित बबन चव्हाण आणी इतर पंधरा ते वीस जना नी मिळून सरपंचसह कुटूंबातील आठ जणांना प्राणघातक हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला याचे मुख्य सूत्र धार हे माजी सरपंच श्री दत्ता सखाराम राठोड हे आहेत. अशी प्रतिक्रिया देतांना सरपंचपती विजय राठोड यांनी दिली आहे. याबत पोलिसात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## महेश मस्के घरकुल छत भरणी मान्यवरांच्या हस्ते संपन्न



**परळी । प्रतिनिधी**

रमाई नगर येथे १४ जुलै २०२५, रोजी रमाई घरकुल योजनेच्या छत.भरणीच्या कार्यक्रमात महेश किसनराव मस्के यांच्या कार्यक्रमास नवीन घराचे छत भरण्याच्या प्रसंगी श्रीफळ फूडण्याची प्रथा पाळली गेली.कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष बाजीराव (भैया) धर्माधिकारी, माजी नगरसेवक नितीन रोड, भारत ताटे, राज जगतकर, सुरज ताटे, आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांनी घरकुल योजनेच्या लाभार्थ्याला शुभेच्छा दिल्या आणि योजनेच्या यशस्वी राबविण्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी संपूर्ण मस्के कुटुंबीय सहभागी होते.

## बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या उपस्थितीत १६ जुलै रोजी अंबाजोगाई येथे शिवसेना उबाठा पक्षाच्या आढावा बैठकीचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे,युवा सेनाप्रमुख,माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना नेते मा.आ.सुनिल प्रभू, मा.विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना उपनेते मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर,उप नेत्या सुषमाताई अंधारे, सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१६ जुलै २०२५रोजी केज व परळी विधान सभेतील शिवसेना, युवासेना,महिला आघाडी व अंगीकृत संघटनेतील पदाधिकारी यांची आढावा बैठक जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांच्या उपस्थितीत होणार आहे.सदरील बैठकीत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकी संदर्भात चर्चा व संघटना बांधणी संदर्भात महत्वपूर्ण चर्चा करण्यात येणार आहे.तरी बीड जिल्हा सचिव रोहीत कसबे व केज तालुका प्रमुख अशोक जाधव यांनी केज,अंबाजोगाई,परळी तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी शासकीय विश्रामगृह अंबाजोगाई येथे दुपारी १.०० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077